पान १ वरुन ...

पाच माजी आमदार दादांच्या छत्रछायेत!

झेंडा हातात घेतला. या पक्ष प्रवेशाने उत्तर महाराष्ट्रात शरद पवार गटाला धक्का बसला आहे.

चर्चगेट येथील के. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी बोलताना अजित पवार यांनी, बेरजेचे राजकारण करत आपण सर्व जाती धर्माच्या घटकांना सोबत घेऊन काम करुया, असे सांगताना सभासद नोंदणीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून उभा करण्याचे आवाहन केले.

धुळ्यात बीडची खिडकी गँग जेरबंद

टोल नाक्यावरील फास्टॅग रेकॉर्ड, सीसीटीव्ही फुटेज व मोबाईल टॉवर्सवरील डेटाच्या साहाय्याने तब्बल ६०० मोबाईल क्रमांक, १०० सीसीटीव्ही क्लिप्स आणि २० टोल नाक्यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित वाहन व फास्टॅगशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकाच्या हालचालींवर लक्ष ठेवलं. संशयित क्रमांकाची कार पुन्हा धुळे परिसरात आल्याचे निदर्शनास येताच २४ एप्रिल रोजी एलसीबीच्या पथकाने पाच आरोपींना अटक केली.

अटक आरोपींची नावे अशी आहेत

शेख अशफाक शेख आसिफ (रा. मोहम्मदीया कॉलनी, आझादनगर, बीड), आगामिर पठाण (रा. तेलगाव नाका, बीड), फिरोज शेख (रा. घोडेगाव, नेवासा), ऐफाझ शेख (रा. पिंपळगाव,

गेवराई) आणि शेख कलीम शेख अलीम (रा. दहिफळ, बीड) या आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ३१ हजाराचे ५ मोबाईल, रोख २ हजार रुपये, चोरीत वापरलेले स्क्रू ड्रायव्हर व कटावणी, ४ लाखरुपये किंमतीची आय-२० कार असा एकूण ४ लाख ३३ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच आरोपींनी चोरीचे सोनं गहाण ठेवले असल्याचे उघड झाले असून त्यामधून ९८.४९ ग्रॅम वजनाचे १० लाख १२ हजार रुपये किमतीचे दागिने व देवपूर येथील लक्ष्मी कॉलनीतील घरफोडीतील १२.३० ग्रॅम सोनं १ लाख २० हजार रुपये किंमतीचे असा एकूण ११ लाख ३३ हजाराचा ऐवज हस्तगत करण्यात आला. या टोळीतील मुख्य आरोपी शेख अशफाक याच्यावर राज्यातील विविध पोलिसात यापूर्वी २४ घरफोड्यांचे गुन्हे दाखल आहेत. इतर आरोपींचाही गुन्हेगारी इतिहास असून त्यांच्याकडून आणखी गुन्ह्यांची कबुली मिळण्याची शक्यता आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, पोसई बाळासाहेब सुर्यवंशी, असई संजय पाटील पोहेकॉ मच्छिद्र पाटील, संदीप पाटील, योगेश चव्हाण, हेमंत बोरसे, प्रल्हाद वाघ, पोकॉ अमोल जाधव यांच्या पथकाने केली.

दहशतवाद संपविणारच :पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची डरकाळी

एकमत आहे. दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्यांप्रती अंगोलाचे राष्ट्रपती लॉरेन्सू यांनी दुख व्यक्त केले. त्यावेळी पंतप्रधानांनी ही एकजुटता दर्शवली. दहशतवादाचे समर्थन करणाऱ्यांविरोधात कडक पावले टाकणार असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा बजावले. त्यामुळे पाकिस्तानची धडधड वाढली आहे. भारत केव्हापण हल्ला करू शकतो, ही भीती पाकला सतावत आहे. भारत अंगोला या देशाला सैन्य प्रशिक्षण आणि आधुनिकीकरणासाठी मदत करत आहे. अंगोला लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी भारत २०० लक्ष डॉलरची मदत करणार आहे. अंगोलाच्या सशस्त्र दलाला प्रशिक्षण देण्यात भारताला मदत करण्यात आनंद होईल असे पंतप्रधान मोदी म्हणाले. दोन्ही देशांच्या संबंधाला आता ४० वर्षे पूर्ण झाली आहेत. अंगोलाच्या स्वातंत्र्य संग्रामात भारताने मदत केली आहे.

पाळधी येथील गणपती मंदिरातील दानपेटी फोडली

■ **पाळधी, ता.धरणगाव । वार्ताहर**

येथील प्रसिध्द असलेल्या गणपतीच्या मंदिराची दानपेटी फोडून त्यातील ५० हजाराच्या रकमेसह बावीस हजाराचे दागिने चोरीस गेल्याने येथे एकच खळबळ उडाली आहे. येथील महामार्गावर असलेल्या व मणियार यांनी बांधलेल्या सिध्दी गणपती मंदिरात मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी मागील दरवाजाचे कुलुपाचे कडी कोयंडा तोडून आत प्रवेश केला.

शेतघरातील माडीवर लपविलेला २५ लाखांचा गांजा जप्त; एकास अटक

■ **धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका पोलिसांनी एनडीपीएस मोहिम हाती घेतली असून काल सलग दुसरी कारवाई करण्यात आली. शिरपूर तालुक्यातील आसरापाणी येथील शेतातील घराच्या माडीवर गोण्या व गाठोड्यामध्ये लपवून ठेवलेला २५ लाख रुपये किंमतीचा ३६० किलो गांजा जप्त केला. याप्रकरणी एकास अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार, शिरपूर तालुका पोलिसांनी काल दि.२ मे रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास आसरापाणी शिवारातील करमसिंग ग्यानसिंग पावरा (वय ३६) याच्या शेतात छापा टाकला. या छाप्यात घर व माळ्यावर गांजाच्या १३ प्लास्टिकच्या गोण्या आढळून आल्या. वेगवेगळ्या कंटेनरमध्ये त्या लपविण्यात आलेल्या होत्या. प्रत्येकी २५ किलो वजनाच्या १२ गोण्या व ३५ किलो वजनाची एक गोणी असा एकूण ३६० किलो सुका गांजा जप्त करण्यात आला. या अंमली पदार्थाची अंदाजे किंमत ७ हजार रुपये किलोप्रमाणे एकूण २५ लाख २० हजार रुपये एवढी आहे. हा गांजा संशयित आरोपीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररित्या साठवून ठेवला होता. त्यांच्याविरोधात गुंगीकारक औषधे द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २०(ब)(क) व २२ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोसई सुनिल वसावे, मनोज कचरे, पोहेकॉ शेखर बागुल यांच्या पथकाने केली.

नंदुरबार जिल्ह्यात ४ ते ७ मे दरम्यान मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

■ **नंदुरबार । प्रतिनिधी -**

नंदुरबार जिल्ह्यात उद्या दि.४ ते ७ मे २०२५ दरम्यान जिल्हयातील काही ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जनेसह पावसाची तसेच गारपीटीची शक्यता कृषि विज्ञान केंद्राच्या जिल्हा हवामान केंद्राने वर्तविली आहे.

जिल्हयात आज दि. ३ मे रोजी वातावरण ढगाळ झाले होते. वाराही जोरदार वाहत असल्यामुळे तापमान कमी झाले. आज दिवसभरात किमान तापमान २७.८ अंश सेल्सीअस तर कमाल तापमान ४०.२ अंश सेल्सीअस नोंदविण्यात आले.

मात्र, उद्या दि.४ मे रोजी जिल्हयातील काही ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता कृषि विज्ञान केंद्राच्या जिल्हा हवामान केंद्राने वर्तविली आहे. उद्या वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० कि.मी. राहण्याची शक्यता आहे.

तसेच दि.६ मे रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक राहून हलक्या स्वरूपाचा पावसाची शक्यता आहे. तसेच दि.७ मे रोजी नंदुरबार जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, गारपिटीसह हलक्या स्वरूपाचा पावसाची शक्यता आहे वर्तविण्यात आली आहे.

आंबा बागेत लपविलेल्या बोगस बियाण्यांवर भरारी पथकाची धाड

१३ लाखांचे बोगस कपाशी बियाणे जप्त; शेतमालकावर गुन्हा, तावसे बु.येथील घटना

■ **चोपडा । प्रतिनिधी**

तालुक्यातील तावसे बु. शिवारात असलेल्या शेतातील आंबा बागेत लपविलेल्या एचटीबीटी बोगस बियाण्यावर कृषी विभागाच्या भरारी पथकाने ग्रामीण पोलिसांच्या मदतीने धाड टाकून १३ लाख रुपये किंमतीचे महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेले ८५० एचटीबीटी बोगस कापूस बियाणे जप्त केल्याची घटना नुकतीच घडली.

बोगस बियाणे प्रकरणी शेतमालक जीवनलाल विश्राम चौधरी यांचेसह दोन बोगस कापूस बियाणे कंपन्यांवर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गेल्या दहा दिवसात भरारी पथकाची बोगस कापूस बियाणे पकडल्याची ही दुसरी मोठी कारवाई आहे. भरारी पथकाच्या धडक कारवाईने जळगाव जिल्ह्यात प्रचंड खडबळ उडाली असून, बनावट कापूस बियाणे विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे.

चोपडा तालुक्यातील तावसे बु! परिसरात बोगस एचटीबीटी कापूस बियाणे विक्री होत असल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक कुर्बान तडवी, कृषी विकास अधिकारी पद्मनाभ म्हस्के, ग्रामीण च्या पोलिस निरीक्षक कावेरी कमलाकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून जिल्हा भरारी पथकाचे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक विकास बोरसे, नाशिक येथील विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक उल्हास ठाकूर, पंचायत समितीचे कृषी अधिकारी किरण पाटील, कृषी सहाय्यक सदाशिव बारेला, किरण गोसावी, तावसे बु. येथील पोलीस पाटील अर्चना पाटील, पोकॉ.चेतन महाजन, पोकॉ.निलेश पाटील यांच्या पथकाने जीवनलाल चौधरी यांच्या तावसे बु. शिवारातील तापी नदी किनारी असलेल्या शेतातील बागेत आंब्याच्या झाडाखाली महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेले १२,७२,००० रुपये किंमतीचे एचटीबीटी कापसाचे योद्धा व सिल्वर (आर) कंपनीचे ८५० बियाण्यांच्या पाकीटांचा बेवारस साठा प्लॅस्टिक गोण्यांमध्ये भरलेला आढळून आल्याने भरारी पथकाने जप्त केला. याप्रकरणी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विकास उत्तमराव बोरसे यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस स्टेशनला संशयित जीवनलाल विश्राम चौधरी व सिल्वर आर व योद्धा या बोगस बियाणे तयार करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध बियाणे कायदा, बियाणे नियम, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, महाराष्ट्र कापूस बियाणे अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सपोनि.शेषराव नितनवरे करीत आहेत.

बोगस बियाण्यांशी माझा काडीमात्र संबंध नाही

◆ तावसे बु. येथील माझ्या शेतात बेवारस सापडलेल्या बोगस कापूस बियाण्याशी माझा काडीमात्र संबंध नाही किंवा बियाणे विकणे माझा व्यवसाय नाही. माझा परंपरागत व्यवसाय शेती आणि हॉटेल आहे. सार्वजनिक जीवनात माझे नाव बदनाम करण्यासाठी कुणी तरी मुद्दाम खोडसाळपणा करून शेतात बोगस बियाणे ठेवले असेल परंतु माझा बोगस कापूस बियाण्याशी काडी मात्र संबंध नाही.

-जीवनलाल विश्राम चौधरी शेतकरी

मोटारसायकलला ट्रकने कट मारल्याने चार जण जखमी

■ **पारोळा । प्रतिनिधी**

येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा वरील हिरापूर फाट्यानजिक एका अज्ञात राखणे मोटरसायकलला कट मारल्यामुळे चार जण जखमी झाल्याची घटना दि.३ रोजी दुपारी चार वाजता घडली. याबाबत सुभाष वाडी वराड येथील सुरज तुकाराम राठोड (वय १८), नकुल तुकाराम राठोड (वय १४), आरती तुकाराम राठोड (वय ११), विवेक विठ्ठल राठोड वय बारा, हे काल दि.२ रोजी अंचाळा तांडा तालुका जिल्हा धुळे येथे लग्नासाठी गेले होते ते लग्न आटपून त्यांच्या शाईन वाहनाने सुभाष वाडी येथे परत जात असताना पारोळा तालुक्यातील म्हसवे शिवारातील हिरापूर फाट्यानजीक त्यांच्या मोटरसायकलला अज्ञात ट्रकने कट मारल्यामुळे त्यांच्या मोटरसायकलला अपघात होऊन त्यात वरील चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना एरंडोल कडे जाणारे ज्ञानेश्वर रामोशी व दीपक वानखडे यांनी त्यांची कार वळवून रस्त्यावर पडलेले जखमींना वाहनात टाकून पारोळा कुटीर रुग्णालय येथे उपचारार्थ दाखल केले त्यांच्यावर डॉ.प्रशांत सोनवणे डॉ.सुनील पारोचे अभिजीत राजपूत यांनी प्रथम उपचार केले व गंभीर जखमी आरती तुकाराम राठोड या बालिकेस उपचारार्थ धुळे येथे हलविण्यात आले याबाबत पारोळा पोलीस ठाण्यात कुठल्याही प्रकारची नोंद उशिरापर्यंत करण्यात आलेली नव्हती.

कल्याण

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
१०-०३ २०२५ १५-०३-२०२५	७ ५ ८ ४९ ६ ९ ८	१ ४ २ ८९ ६ ५ ९	३ १ ६ ८३ ५ ९ ७	१ १ ५ २९ ८ ६ ०	●	१ ७ ३ ४४ ८ ० ९
१७-०३ २०२५ २२-०३-२०२५	५ ७ ५ ८२ ७ ८	२ २ ४ ०१ ९ ४ ०	५ ३ ७ १४ ४ ९ ७	१ ७ २ ३३ ८ ० ८	१ ६ ० ७० ७ ० ७	८ २ ८ ६६ ७ ० ७
१७-०३ २०२५ २२-०३-२०२५	१ १ ३ ३३ ३ १ ९	६ ३ ७ ०० ३ ७ ४	४ ५ ७ १० ५ ० ०	८ २ ९ ७९ ८ ० ९	२ १ ५ ३४ ५ ७ ५	२ ५ ३ ९६ ५ ४ ६
३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५	१ ३ २ १२ ३ ८ ६	४ ३ ६ ०४ ५ ० ६	८ ३ ८ ६६ ६ ० ७	१ ५ ७ ६१ ६ ८ ०	१ १ ६ ६२ ३ ९ ८	२ ६ ३ ०२ ७ ५ ९
०७-०४ २०२५ १२-०४-२०२५	१ ५ ८ ९१ ८ ० ८	२ २ ४ ३६ ६ ७ ८	७ २ ८ ४४ ३ ९ ९	२ ६ ७ ६३ ७ ७ ०	३ २ ४ २३ ३ ५ ८	४ ६ ६ ९३ ८ ९ ९
१४-०४ २०२५ १९-०४-२०२५	२ ३ ५ ४० ८ ७ ९	२ २ ७ ९६ ६ ० ८	१ ५ ६ ६२ ७ ९ ०	५ २ ५ ८० २ ८ ६	४ १ ८ १५ ६ ९ ८	३ २ ५ ७६ ४ ९ ०
२१-०४ २०२५ २६-०४-२०२५	२ ५ ४ ३५ ० ७ ०	४ ३ ६ ९१ ३ ९ ५	१ २ ४ ४४ ४ ९ ८	२ ४ ९ ०८ ५ ९ ९	४ ७ ९ ३४ ८ ० ९	२ २ ५ ४६ ६ ७ ८
२८-०४ २०२५ ०३-०५-२०२५	७ २ ८ ४३ ५ ९ ६	१ १ २ १४ ६ ८ ७	३ १ ४ २५ ६ ५ ८	१ १ ५ ६९ ८ ० ०	१ १ ३ ०५ ५ ६ ९	

मिलन डे

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
१०-०३ २०२५ १५-०३-२०२५	२ २ ३ ४४ ४ ९ ८	६ १ ७ १३ ४ ८ ८	३ १ ४ २९ ४ ५ ४	७ २ ७ ४२ ५ ० ५	●	१ २ ४ ४७ ७ ९ ८	●
१७-०३ २०२५ २२-०३-२०२५	१ १ २ ३६ १ ० ४	५ ५ ७ १२ ८ ९ ९	३ १ ८ ९५ ७ ८ ७	१ ४ ३ २८ ७ ८ ७	३ १ ५ ७९ २ ९ ६	५ ६ ८ १३ ७ ८ ०	●
१७-०३ २०२५ २२-०३-२०२५	१ २ ३ २८ ६ ८ ०	७ २ ८ ३७ ५ ८ ०	३ १ ४ ३८ ७ ६ ०	१ ३ ६ ७१ ८ ० ०	१ ३ ४ ३४ ५ ८ ६	१ ६ ४ ०३ ७ ५ ०	●
३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५	४ १ ५ ४५ ५ ५ ९	६ ३ ७ ३६ ६ ० ७	२ ४ ३ १९ ६ ६ ९	६ ४ ८ २६ ४ ८ ८	८ ३ ८ ५४ ५ ९ ६	१ ५ २ ३४ ९ ० ०	●
०७-०४ २०२५ १२-०४-२०२५	३ २ ६ ५१ ९ ६ ०	२ १ ४ ३१ १ ७ ९	१ ४ ५ ६१ ८ ० ९	१ ४ ९ ४० ७ ९ ९	४ १ ४ ४२ १ ६ ०	१ १ ६ ६६ १ ९ ४	●
१४-०४ २०२५ १९-०४-२०२५	६ ३ ६ ९७ ७ ७ ७	१ २ ८ ९२ ४ ० ६	३ १ ४ ४४ ५ ७ ८	१ ४ ३ ८ ५ ७ ९	४ १ ५ ९१ ३ ० ७	५ ५ ५ ७२ ८ ७ ९	●
२१-०४ २०२५ २६-०४-२०२५	२ ८ ० २६ ९ ० ९	५ २ ९ ४१ ४ ० ५	१ २ २ १७ ७ ८ ८	२ ५ ३ २० ७ ७ ८	१ २ ३ ८५ ३ ४ ०	२ १ ८ ९० ३ ९ ६	●
२८-०४ २०२५ ०३-०५-२०२५	२ ३ ३ ३३ ४ ८ ६	१ २ ७ ८६ ४ ० ०	४ १ ४ २५ ६ ४ ८	३ २ ८ ०३ ३ ९ ८	१ ६ ७ ७४ ९ ९ ९		●

मिलन नाईट

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
१०-०३ २०२५ १५-०३-२०२५	४ ४ ६ ७८ ५ ७ ९	४ ४ ५ ७८ ७ ८ ७	३ ३ ७ ९३ ४ ९ ६	३ ३ ४ ६९ ७ ९ ९	●	४ १ ९ ३१ ४ ० ६
१७-०३ २०२५ २२-०३-२०२५	४ २ ६ ७७ ६ ७ ९	१ ३ १ ५१ ८ ३ ०	५ १ ५ ८२ ५ ८ ६	४ २ ४ ८९ ७ ० ०	४ ४ ५ ५५ ५ ६ ६	१ १ २ ८५ ६ ५ ८
१७-०३ २०२५ २२-०३-२०२५	२ ३ ९ ०२ ४ ९ ५	१ ३ ९ ९० ७ ९ ०	१ १ १ ४६ ४ २ ९	१ ३ २ २१ ६ ८ ०	३ १ ४ २३ ३ ५ ९	१ ३ १ ८८ ५ ६ ०
३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५	२ १ ४ ३७ ७ ७ ९	६ १ ९ ५१ ३ ० ७	३ २ ३ ३३ ४ ७ ७	१ ४ २ ३७ ४ ० ९	२ २ ० २३ ४ ० ७	२ २ ६ ८४ ३ ० ९
०७-०४ २०२५ १२-०४-२०२५	२ २ ८ ०९ ३ ० ४	८ ६ ८ ६५ ९ ० ०	४ ३ ५ ६१ ८ ७ ०	१ ६ २ २५ ९ ९ ०	८ १ ८ ६४ ५ ० ८	५ १ ९ ४५ ७ ० ७
१४-०४ २०२५ १९-०४-२०२५	३ ३ ६ ८० ३ ९ ४	५ १ ६ ९३ ५ ८ ७	१ २ ६ ७६ ६ ० ८	१ १ ७ ८७ ६ ० ०	२ १ ४ ०७ ६ ४ ०	२ ५ ४ ६२ ७ ० ०
२१-०४ २०२५ २६-०४-२०२५	१ १ ४ ०५ ६ ५ ८	२ १ ४ २८ ८ ६ ९	६ १ ८ ४४ ६ ० ७	१ १ ५ २७ ६ ६ ०	२ ६ ३ ०५ ९ ५ ०	१ १ २ ९४ ४ ६ ९
२८-०४ २०२५ ०३-०५-२०२५	२ १ ३ ४५ ७ ९ ७	२ ७ ८ ०५ ८ ० ०	१ १ ५ ४७ ३ ८ ३	१ ६ ५ ५१ ७ ९ ८		

निधन वार्ता

विश्वासराव ठाकरे

शिरपूर । प्रतिनिधी। तालुक्यातील गरताड गावातील रहिवासी तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक विश्वासराव सीताराम ठाकरे (वय ८० वर्षे) यांचे दि. ३० एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. आर. सी. पटेल मराठी माध्यमिक विद्यालय भामपूर येथील शिक्षक दिनेश विश्वासराव ठाकरे, सतीश विश्वासराव ठाकरे यांचे वडिल तर भालचंद्र नानाभाऊ ठाकरे, रविंद्र नानाभाऊ ठाकरे यांचे काका होत.

शालिनी अहिरराव

धुळे । प्रतिनिधी । देवपूरातील इंदिरा गार्डन परिसरातील रहिवासी सौ. शालिनी उद्धव अहिरराव (वय ७०) यांचे आज दि.३ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्या उद्धव नारायणशेठ अहिरराव (सोनार) यांच्या पत्नी होत.

पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाडचाने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

गुरुवार ०१/०५/२०२५
मेन बाजार -३८०-१३-२५६
मिलन ना.-१५९-५१-६७८

शुक्रवार ०२/०५/२०२५
मेन बाजार -
कल्याण-१३६-०५-१५९
मिलन डे -१७९-७४-६९९
मिलन ना.-

क्लासिफाइड

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

१००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalvenashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.